दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १४८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.०९ जानेवारी २०२५

**।।सुविचार।।**

प्रत्येकाशी प्रेमाने वागलं पाहिजे. जे तुमच्याशी वाईट वागतात, त्यांच्याशीही प्रेमानच वागल पाहिजे,
**ते चांगले आहेत म्हणून नाही, तर तुम्ही चांगले आहात म्हणून.**

## वाळू तस्करांचा हैदोस ! तलाठ्याला टिप्परने उडविले !!



**अक्षराज : प्रतिनिधी**


**दि.०८, बुलडाणा :** रेतीचे अवैध उत्खनन, वाहतुकीचा केंद्रबिंदू ठरलेल्या खडकपूर्णा धरण परिसरात प्रशासनाच्या नाकावर टिच्चून रेती माफियांचा गोरखधंदा राजरोसपणे सुरु आहे. रेती माफियाचे मनोधैर्य कमालीचे वाढले आहे. काल मंगळवारी याचा भीषण प्रत्यय आला. रात्री दहा वाजताच्या सुमारास रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या टिप्परने एका तलाठ्याला सुसाट वेगाने अक्षरशः उडविले. या जोरदार धडकेमुळे तलाठी गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती अत्यवस्थ आहे. त्याला जालना येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे.

देऊळगाव राजा तालुक्यातील देऊळगाव मही येथे ही घटना घडली. परमेश्वर दामोधर बुरकुल असे गंभीर जखमी कर्मचाऱ्याचे नाव आहे. घटनेचा विस्तृत तपशील मिळाला नसून प्राथमिक माहितीनुसार, तलाठी परमेश्वर बुरकुल हे दुचाकीने देऊळगावराजाकडे जात होते. दरम्यान, मही गावाजवळ त्यांना अज्ञात टिप्पर चालकाने संभाव्य कारवाईच्या भीतीने सुसाट वेगात जोरदार धडक दिली. त्यामध्ये बुरकूल हे गंभीर जखमी झाले. त्यांना प्रारंभी तातडीने नाजिकच्या देऊळगाव मही येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

ग्रामीण रुग्णालयात त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. मात्र त्यांच्या जखमा गंभीर स्वरूपाच्या असल्याने आणि त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जालना येथे हलविण्यात आले. दरम्यान घटनेची माहिती मिळताच देऊळगावराजा पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना घटनेची माहिती देऊन देऊळगाव राजा पोलिसांनी सुसाट वेगाने पसार झालेल्या टिप्परचा शोध सुरू केला होता. आजूबाजूच्या पोलीस ठाण्यांना याची माहिती देऊन नाकाबंदी करण्यात आली. मात्र कर्मचाऱ्यांस गंभीर जखमी करणाऱ्या वाहनाचा शोध लागू शकला नाही. प्रकरणी देऊळगाव राजा पोलिसांनी अज्ञात टिप्पर चालकाविरोधात विविध कलमानुसार गुन्हे दाखल केले आहेत.

या घटनेमुळे वाळू माफियांच्या मुसक्या आवळण्यासाठी जिल्हा यंत्रणेने युद्ध पातळीवर काम कण्याची गरज निर्माण झाली आहे. जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी दोन दिवसांपूर्वी पोलीस विभाग, महसूल खाते, प्रादेशिक परिवहन विभागाची संयुक्त बैठक घेतली होती. त्यात संयुक्त कारवाई करण्याचे सुतोवाच करण्यात आले. मात्र या घटनेने रेती माफियाची मुजोरी, मनोधैर्य किती वाढले हे दिसून येते.

## आयटी कंपनीत लेखापाल तरुणीचा खून
## आर्थिक वादातून थरारक घटना




**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.८, पुणे :** विमाननगर येथील डब्ल्यूएनएस आयटी कंपनीत लेखापाल म्हणून काम करणाऱ्या मित्राने मैत्रिणीवर धारदार चाकूने वार करून खून केला. ही घटना सोमवारी सायंकाळी इमारतीच्या पार्किंगमध्ये घडली. या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.शुभदा शंकर कोदारे (वय २८, रा. बालाजीनगर, कात्रज, पुणे) असे खून झालेल्या तरुणीचे नाव आहे. कृष्णा सत्यनारायण कनोजा (वय ३०, रा. खैरेवाडी, शिवाजीनगर, कात्रज, पुणे) असे आरोपीचे नाव आहे. शुभदा आणि कृष्णा एकाच कंपनीत लेखापाल म्हणून नोकरीला होते.

शुभदाने कृष्णाकडून काही रक्कम उसनी घेतली होती. मात्र, पैसे देण्यास टाळाटाळ केल्याने दोघांच्यात वाद झाले होते. सोमवारी सायंकाळी इमारतीच्या पार्किंगमध्ये त्यांच्यात पुन्हा वाद झाले. यातून कृष्णाने धारदार चाकूने शुभदावर वार केले.सुरक्षारक्षकांनी तिला तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असताना रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास तिचा मृत्यू झाला. पोलिसांनी आरोपीला अटक केली असल्याचे पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांनी सांगितले.

दरम्यान, आर्थिक देवाण-घेवाणीच्या वादातून नामांकित आयटी कंपनीत काम करणाऱ्या तरुणीवर तरुणाने वार केल्याच्या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली. शुभदा कोदरे आणि आरोपी कृष्णा कानोजा हे एकमेकांना बऱ्याच काळापासून ओळखत होते. दरम्यान कृष्णाने शुभदाच्या उजव्या कोपऱ्यावर धारदार शस्त्राने वार केला. यावेळी मोठा गोंधळ उडाला. जखमी अवस्थेतच शुभदाला सह्याद्री हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान तिने अखेरचा श्वास घेतला.

## १ एप्रिल पासून टोलनाक्यांवर फास्ट-टॅग द्वारेच पथकर

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, ठाणे :** राज्यातील पथकर वसुली नाक्यांवर १ एप्रिल २०२५ पासून सर्व वाहनांचा पथकर फास्ट-टॅग द्वारेच भरावा लागणार आहे. या निर्णयानुसार सध्याच्या सार्वजनिक खासगी सहभाग धोरण २०१४ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

फास्ट टॅगच्या माध्यमातून पथकर वसुली झाल्यास पथकर वसुलीत अधिक सुसूत्रता, पारदर्शकता येणार आहे. पथकर नाक्यांवर वाहनांचा खोळंबा कमी होणार आहे. यातून वेळेची, इंधनाची बचत होणार आहे. फास्ट-टॅग शिवाय अन्य कोणत्याही माध्यमातून पथकर भरायचा झाल्यास किंवा फास्ट-टॅग सुरु नसेल किंवा टॅगशिवाय वाहनाने फास्ट-टॅगच्या मार्गिकेत प्रवेश केल्यास दुप्पट पथकर भरावा लागणार आहे.

राज्यात सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १३ आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ९ रस्ते प्रकल्पांवर पथकर वसुली सुरु आहे. या ठिकाणी तसेच भविष्यात पथकर वसुल करावा लागणाऱ्या प्रकल्पांसाठी हा निर्णय लागू राहणार आहे.

## हस्तीदंत तस्करीप्रकरणी दोन आरोपींवर कारवाई
## १०.६० लाखांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.८, डोंबिवली (ठाणे) :** मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एमआयडीसी परिसरात हस्तीदंत (हत्तीचे दात) विक्रीसाठी येणाऱ्या दोन तस्करांना पोलिसांनी अटक केली आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने ही कारवाई करून १०.६० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

दि.५ जानेवारी २०२५ रोजी मानपाडा पोलीस ठाण्याला खात्रीशीर माहिती मिळाली की, दोन इसम हत्तीचे दात विक्रीसाठी एमआयडीसी परिसरात येणार आहेत. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने सापळा रचून आरोपींना शिताफीने ताब्यात घेतले.१. आकाश प्रकाश पवार (वय २८),२. नितीन विलास धामणे (वय २६)दोघेही रा. इंदू अपार्टमेंट, पाचवा मजला, भाजी मार्केटजवळ, तुकाराम चौक, डोंबिवली पूर्व येथे राहणारे आहेत.जप्त केलेल्या मुद्देमालात हत्तीचे २ दात (हस्तीदंत),एक मोटार स्कूटर,दोन मोबाईल,एकूण किमती: १०,६०,०००/- रुपये हस्तगत करण्यात आले.दोन्ही आरोपींविरुद्ध वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत कलम ९, ३९, ४४, ४९ (क) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

ही यशस्वी कारवाई अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग संजय जाधव, पोलीस उपायुक्त परिमंडळ ३, कल्याण अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त डोंबिवली विभाग सुहास हेमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कामगिरीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने, पोलीस निरीक्षक राम चोपडे, दत्तात्रय गुंड, जयपाल गिरासे यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश राळेभात

संपत फडोळ, पोलीस हवालदार/ राजेंद्रकुमार खिलारे, सचिन साळवी, सुनिल पवार, शिरीष पाटील, संजु मासाळ, विकास माळी, पोलीस नाईक / गणेश भोईर, कृष्णा बोराडे, यल्लापा पाटील, पोलीस शिपाई / घनश्याम ठाकुर, अशोक आहेर, गणेश बडे व सोपान शेळके या पथकाने पार पाडली.

## अतिक्रमण विभागामार्फत कोपरखैरणे व वाशी विभागात निष्कासनाची कारवाई

**अक्षराज : जे. के पोळ**

**दि.०८, नवी मुंबई :** उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे व वाशी विभागात निष्कासनाची कारवाई केली.

कोपरखैरणे विभाग अंतर्गत १) वसीम अकबर अली खान, रूम नं.२२, सेक्टर-१५, कोपरखैरणे, नवी मुंबई, व २) अंकुश नाना जगताप/ योगेश नाना जगताप, एस.एस. टाईप, रूम नं. ६७८, सेक्टर-१५, कोपरखैरणे, यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. सदर बांधकामावर तोडक कार्यवाही करण्यात आली. त्यापैकी वसीम अकबर अली खान यांचेकडून अनधिकृत बांधकाम हटविणेपोटी दंडात्मक शुल्क रू.१०,०००/- वसूल करण्यात आलेले आहे.

सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहा.



आयुक्त सुनिल काठोळे, कनिष्ठ अभियंता चंद्रकांत धोत्रे व इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

ठाणे बेलापूर रोड कोपरखैरणे ब्रीज खालील १९ बेघर लोकांचे सामान जप्त करून डपिंग येथे जमा करण्यात आले. तसेच सेक्टर-१९,२० व कोपरखैरणे गाव येथील शाळा परिसराच्या १०० मीटरच्या आत तंबाखू/पानविक्री/गुटखा विक्री करणाऱ्या ०३ टपऱ्यांचे सामान जप्त करून डपिंग येथे जमा करण्यात आलेले आहे. या मोहिमेकरीता कोपरखैरणे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदूंबर पाटील, त्यांचे विभागाकडील पोलिस उपस्थित होते.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सी विभाग वाशी अंतर्गत अफताब जाकारीया जानवेकर व परवेज जाकारीया जानवेकर, युनिट क्र. एस.एस/३-२२७, सेक्टर- २, वाशी, नवी मुंबई यांचे इमारतीचे बांधकाम कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु होते. सदर अनधिकृत बांधकामास वाशी विभागामार्फत नोटीस बजाविण्यात आलेली होती.

संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हुन हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले असल्यामुळे दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी सदर अनधिकृत बांधकामावर वाशी विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले. तसेच संबंधितांकडून रु. २५,०००/- दंड ही वसुल करण्यात आलेला आहे. तदनंतर संबंधितांनी पुन्हा काम सुरु ठेवल्यामुळे दि.०६ जानेवारी २०२५ रोजी सदर अनधिकृत बांधकामावर वाशी विभागामार्फत पुन्हा तोडक मोहिमेचे आयोजन करुन करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले. तसेच संबंधितांकडून रु.१०,०००/- दंड ही वसुल करण्यात आलेला आहे. या धडक मोहिमेसाठी सी विभाग कार्यालयाचे सहायक आयुक्त सागर मोरे तसेच अतिक्रमण विभागाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

## मुंबईत लोकलने विनातिकीट प्रवास करणाऱ्यांना आता दंडावरही लागणार जीएसटी

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.८, मुंबई :** मुंबई लोकलमधून दररोज हजारो लोक प्रवास करतात. मात्र त्यातील अनेक जण विनतिकिट प्रवास करतात त्यावर बडगा उगारण्यासाठी आता आणखी एक प्रस्ताव रेल्वेकडे पाठवण्यात आला आहे.

रेल्वे प्रशासनाने विनातिकिट प्रवास करणाऱ्या नागरिकांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. लवकरच रेल्वे प्रशासनाकडून दंडाची रक्कम वाढवण्यात येण्याची शक्यता आहे. पश्चिम आणि मध्य रेल्वेकडून तसा प्रस्ताव रेल्वे प्रशासनाला दिला आहे. त्यामुळं येत्या काळात लोकलमधून फुकट प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून दंडाची अधिक रक्कम वसूल करण्यात येऊ शकते.

रेल्वे प्रशासनाकडून लोकलमध्ये विनतिकिट प्रवास करणाऱ्या प्रवाशांविरोधात विशेष मोहिम राबवण्यात येते. दररोज हजारो प्रवासी विनातिकिट प्रवास करतात. त्यांच्याकडून वसुल करण्यात आलेल्या दंडाची रक्कम देखील जास्त असते. या दंडाच्या रकमेतून



रेल्वेला चांगला महसूल देखील मिळतो. मात्र, या फुकट्या प्रवाशांना चाप बसावा यासाठी रेल्वेने आता कारवाई अधिक कठोर करण्याचा विचार केला आहे. सध्या रेल्वेकडून फुकट्या प्रवाशांकडून २५० रुपये दंड आकारण्यात येतो. मात्र लवकरच या दंडाच्या रकमेत वाढ होण्याची शक्यता आहे.

रेल्वे सध्या प्रवाशांकडून आकारत असलेल्या दंडाची रक्कम २५० रुपये आहे. सेकंड क्लास, फर्स्ट क्लास आणि एसी कोच साठीही हिच रक्कम आकारली जाते. मात्र रेल्वे प्रशासनाला दिलेल्या प्रस्तावानुसार, सेकंड क्लास साठी २५० रुपये, फर्स्ट क्लास साठी ७५० रुपये आणि एसी लोकलसाठी १ हजार रुपयांचा दंड आकारण्यात यावा असं नमूद केलं आहे. तसंच, लंबा पल्लयाच्या ट्रेन साठी जितका दंड आकारला जातो त्यावर अतिरिक्त ५ टक्के जीएसटी देखील आकारण्यात यावा, असदेखील प्रस्तावात म्हणण्यात आलं आहे. फर्स्ट क्लास आणि एसी कोच मधून विनातिकिट प्रवास करणाऱ्यांकडून २५० रुपये, तिकिटाचे पैसे आणि अतिरिक्त जीएसटी देखील आकारण्यात येईल. रेल्वेच्या नव्या प्रस्तावात विविध श्रेणी नुसार दंड आकारण्याची शिफारस केली आहे. हा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. मंजुरी मिळाल्यानंतरच हा नियम लागू होणार आहे.

विनातिकिट प्रवास करणाऱ्या नागरिकांची संख्या वाढत असल्याने रेल्वेने हा निर्णय घेतला आहे. रेल्वे अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे की, लांब पल्लयाच्या ट्रेनसाठी सध्या दंड आकारण्याची प्रक्रिया आधीपासूनचे वेगवेगळी आहे. 3AC, 2AC, 1 AC कोच साठी वेगवेगळे दंड आकारण्यात येत आहे. यात दंडाची रक्कम, तिकिटाची रक्कम आणि जीएसटी देखील आकारण्यात येते.

## गच्चीवरुन पडल्याने कामगाराचा मृत्यू

**दि.८, पुणे :** विद्युत जोडणीचे काम करताना गच्चीवर लावलेल्या शिडीवरुन पडल्याने कामगाराचा (वायरमन) मृत्यू झाल्याची घटना वडगाव शेरीतील वृंदावननगर भागात घडली. कामगाराच्या सुरक्षेची काळजी न घेता हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवून विद्युत विषयक कामे करणाऱ्या ठेकेदाराविरुद्ध येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

युसुफ शेख (वय ४७, रा. कोंढवा) असे मृत्यूमुखी पडलेल्या कामगाराचे नाव आहे. वडगाव शेरीतील वृंदावननगर भागात ४ जानेवारी रोजी दुपारी ही घटना घडली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, वडगाव शेरीतील वृंदावननगरमधील एका गृहप्रकल्पावर शेख हे विद्युतविषयक कामे करत होते. त्यावेळी गच्चीवर काम करत असताना लोखंडी शिडी घसरल्याने ते खाली पडले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

## संपादकीय



## प्रेम करा,पण...

युवकांमधील व्यसनाधिनता व वाढती गुन्हेगारी याचा परस्परसंबंध असून या भयावह परिस्थितीत तरुणांनी शिक्षण, रोजगार आणि स्वविकासाला प्राधान्य देत कोणत्याही व्यसनाला बळी पडू नये. तरुणांनो प्रेम करा, पण प्रेमात निर्व्यसनीच जोडीदार निवडा असे कळकळीचे आवाहन पोलीस उपअधीक्षक डॉ. अशोक बागुल यांनी केले.

ऑरेंज सिटी समाजकार्य महाविद्यालय नागपूर, नेहरू युवा केंद्र आणि जनमानस बहुउद्देशीय विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित 'नशीली दवाईयो की लत और मादक द्रव्य का सेवन- युवा जागरूकता कार्यक्रम' या कार्यक्रमात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे जिल्हा बाल रक्षण समन्वयक प्रसेनजित गायकवाड यांनी 'मुलांना व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे, अन्यथा त्यांचा विस्फोट होऊन ते व्यसनाधीनतेकडे वळतात' असे महत्वाचे विचार अधोरेखित करीत युवकांना व्यसनाधीनतेपासून दुर राहण्याचे आवाहन केले. यावेळी मेयोचे मानसोपचार तज्ज्ञ डॉ. सावजी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण, कोराडी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक रघुनाथ कडके हे प्रामुख्याने उपस्थित होते. सदर कार्यक्रमात डॉ. अशोक बागुल यांनी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात विद्यार्थ्यांना व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम आणि त्याला आळा घालण्यासाठी विविध उपाययोजना सांगितल्या. तणाव व्यवस्थापनासाठी व्यायाम, संगीत हे अत्यंत परिणाम कारक साधने आहेत असेही सांगितले.

डॉ. सावजी यांनी देखील व्यसनाधीन व्यक्तीला जर डिप्रेशनमधून बाहेर काढायचे असेल तर त्याला प्रेम, ममता व माणूसकीने त्याच्याबरोबर व्यवहार केला तरच तो त्यातून बाहेर पडू शकतो असे व्यक्तव्य केले. मुस्ताक पठाण यांनी मानव तस्करी या विषयावर सखोल प्रकाश टाकून समाजकार्याचे विद्यार्थी म्हणून आपली काय भूमिका असावी यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व नशा बंदी मंडळाचे जिल्हा संघटक गौरव आळणे यांनी नशामुक्त भारतअंतर्गत दीडशे विद्यार्थ्यांकडून व्यसनमुक्तीची सामूहिकरीत्या शपथ घेतली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. महेंद्रकुमार मेश्राम, प्राचार्य, ऑरेंज सिटी समाजकार्य महाविद्यालय, नागपूर यांनी गुन्हेगारी व व्यसनाधीनता याची भयानक परिस्थितीची जाण करून देत युवा पिढी कशी भरकटत चालली आहे याची वास्तविकता विद्यार्थ्यांपुढे मांडली.

### जेलमध्ये..

मातली सर्वत्रहडबड
गजाआड नेता जाई
इच्छाअसे विरोधकां
तुरुंगाची हवा खाई

चटपटीत बातम्या या
चर्चा रंगली ठाई ठाई
उघडपणे वा गुपचूप
वाटतीखुशीत मिठाई

वकिलांची फौजउभी
कायद्याशी हाता पाई
डोके खाजवे करकरा
आता कशी दे सफाई

कसा मिळेलं जामीन
बुध्दीची केली कल्हई
जेलमध्ये रे शोकसभा
बाहेरवाजली शहनाई

काय हवे काय नको
तुरुंगात काळजी घेई
घरचाडबा गरमागरम
जातीने सारे लक्ष देई

शांत रहावे जेलमध्ये
करु नका काही घाई
एसी टिव्ही फ्रीजसह
मिळेलं मऊ चारपाई

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# महाकुंभाची जमीन वक्फ बोर्डाची कशी ?

प्रयागराज येथे महाकुंभाची सिद्धता अंतिम टप्यात आली आहे. लाखो भाविक आणि भक्तगण आतापासूनच या पावन क्षेत्रात आले आहेत. देशभरातून आणि विदेशातूनही संत-महंत, योगी, संन्यासी, साधू, साध्वी या ठिकाणी शाहीस्नानासाठी येतात. त्यांचे दर्शन आणि मार्गदर्शन घेण्यासाठी कोट्यवधी भक्तगण या ठिकाणी येतात. यंदा हा आकडा ५० कोटीच्या घरात जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. प्रशासनाकडूनही भाविकांची चोख व्यवस्था करण्यात आली आहे.

देशाच्या अर्थकारणात मोठा हातभार लावणाऱ्या हिंदूंच्या या महा उत्सवाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्यात आली आहे. हा सोहळा जवळून पाहण्यासाठी आणि येथील सात्विकता अनुभवण्यासाठी हजारो पर्यटक भारतात येतात. दर तीन वर्षांनंतर एकदा अश्या पद्धतीने बारा वर्षांत प्रयागराज, उज्जैन, नाशिक (त्र्यंबकेश्वर), हरिद्वार या चार वेगवेगळ्या तीर्थक्षेत्री पूर्ण कुंभमेळे भरत असतात. दर सहा वर्षांनी हरिद्वार व प्रयाग येथे अर्धकुंभमेळा भरतो. सूर्याभोवती भ्रमण करणारे नऊ ग्रह एका रेषेत येतात त्यावेळी सूर्याचे किरण ज्या स्थानावर पडतात तिथे कुंभमेळ्याचे औचित्य असते असे मानले जाते. कुंभमेळ्यासाठी कोणालाही निमंत्रण दिले जात नाही. तरीही कोट्यवधी भक्तगण या ठिकाणी येतात हे या पर्वाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. कुंभमेळ्याचा संदर्भ पौराणिक धर्मग्रंथांतून दिसून येतो. भगीरथाने प्रयत्न करूनही गंगा नदी पृथ्वीवर अवतरण करायला तयार होत नव्हती, त्यावेळी तिला असे सांगितले गेले की कुंभमेळा प्रसंगी तुझ्या पाण्यात साधू स्नान करतील. हे ऐकताच तिने पृथ्वीवर येण्याचे मान्य केले. त्यामुळे कुंभमेळ्यात विविध आखाडे आणि साधू यांचे विशेष महत्त्व आहे. या उत्सवात विविध साधू आणि त्यांचे आखाडे यामध्ये होम-हवन, वैदिक मंत्रांचे पठण, प्रवचने, लोकांना उपदेश करणे असे अनेक विविध उपक्रम पहायला मिळतात. लाखो वर्षांपूर्वीपासून गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या पवित्र त्रिवेणी संगमावर कुंभमेळ्याचे आयोजन होत आले आहे. जिथे कुंभ भरतो, ती गंगा मातेची भूमी असल्याचे मानले जात आहे. महाकुंभाचे एव्हढे सारे वैशिष्ट्य असताना आता एका नव्या वादाला तोंड फुटले आहे. ऑल इंडिया मुस्लिम जमातचे राष्ट्रीय अध्यक्ष मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांनी कुंभमेळा स्थळावरील ५४ बीघा भूमीवर वक्फचा दावा केला आहे. वक्फच्या भूमीवर कुंभमेळा आयोजित करणे हा मुस्लिम समाजाचा मोठेपणा



असल्याचे विधानही त्यांनी केले आहे. महाकुंभाची सिद्धता अंतिम टप्यात आली असताना मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांनी केलेले विधान हा वक्फचा खोडकरपणा असून समस्त हिंदूकडून त्यांचा निषेध केला जात आहे. कुंभमेळ्याच्या पवित्र वातावरणाला आणि हिंदूंच्या श्रद्धेला गालबोट लावण्याचा हा प्रकार असून मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी हिंदू संघटनांनी केली आहे.

जगभरात ज्या ज्या ठिकाणी मुस्लिमांची श्रद्धास्थाने आहेत त्या ठिकाणी गैर मुस्लिमांना दुकाने लावण्यास परवानगी दिली जात नाही, मग हिंदूंच्या परम पवित्र महाकुंभाच्या ठिकाणी मुस्लिमांना दुकाने लावण्यास परवानगी दिली जाऊ नये अशी भूमिका काही संत महंत आणि हिंदू संघटनांनी घेतली आहे. त्या संदर्भात बोलताना मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांनी महाकुंभाची ५४ बीघा जमीन वक्फची असल्याचा दावा करत मुस्लिमांना त्याठिकाणी केलेल्या प्रवेशबंदीला विरोध केला आहे तर अरब राष्ट्रात वक्फ ही संकल्पनाही अस्तित्वात आली नव्हती तेव्हापासून प्रयागराजच्या पवित्र संगमावर कुंभमेळा आयोजित केला जात असल्याचे दाखले देत हिंदु जनजागृती समितीने मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांचे विधान खोडून काढले आहे. वक्फ बोर्ड किंवा वक्फ कायदा आज पाकिस्तानसह कोणत्याही मुस्लिम राष्ट्रात नाही. असा कायदा बहुसंख्य हिंदू असलेल्या हिंदुस्थानात आहे याचे कोणालाही नक्कीच आश्चर्य वाटेल. या वक्फ बोर्डाची स्थापना १९५४ साली केंद्र सरकारनेच केली असून आज देशभरात असे ३० हून अधिक वक्फ बोर्ड आहेत. १९९५ च्या वक्फ कायद्याच्या कलम तीनमध्ये असे लिहिले आहे की वक्फला कोणतीही जमीन आपली आहे, असे वाटत असले तरी ती त्याची मालमत्ता असेल. वक्फ बोर्डाला हे सिद्ध करण्याचीही गरज नाही. वक्फ बोर्डाने एखाद्या व्यक्तीच्या जमिनीवर हक्क सांगितला आणि ही जमीन वक्फची असल्याचे सांगितले तर ती चुकीची सिद्ध करण्याची जबाबदारी वर उल्लेख केल्यानुसार त्या जमिनीच्या मालकाची असेल. जर न्यायाधिकरणाने मालकाची आवृत्ती स्वीकारली नाही, तर न्यायालयही हा निर्णय बदलू शकत नाही. एखादी जमीन एकदा वक्फची झाली कि ती कायमस्वरूपी वक्फचीच होऊन जाते. त्या जमिनीवरील स्थावर जंगम मालमत्ताही वक्फच्या अधिकारात येते. वक्फ हा अरबी शब्द आहे ज्याचा अर्थ राहणे असा असून देवाच्या नावाने अर्पण केलेली वस्तू असाही त्याचा एक अर्थ सांगितला जातो. वक्फ म्हणजेच कोणत्याही मुस्लिमाने धार्मिक कार्यासाठी दान केलेली मालमत्ता. १९९५ साली देशात पी.व्ही. नरसिंहराव सरकार असताना सरकारने १९५४ च्या वक्फ कायद्यात सुधारणा करून वक्फ बोर्डाला अमर्याद अधिकार बहाल केले. ज्यामुळे दानधर्म राहिला बाजूला भारतातील वक्फ बोर्ड हिंदूंच्याच भूमीवर अधिकार सांगून ती भूमी ताब्यात घेऊ लागला आहे. वक्फ कायदा १९९५ चे कलम ४० म्हणते की, एखादी जमीन कोणाची आहे, हे 'वक्फ बोर्ड' ठरवेल. वक्फला जर एखादी जमीन आपल्या आपल्या मालकीची वाटल्यास, ती जमिन वक्फ बोर्डाची होईल. देशभरात मनमानी करून मुस्लिमेतर समाजाची लाखो एकर भूमी बळकावणाऱ्या वक्फ बोर्डाला दिलेल्या अमर्याद अधिकारांवर अंकुश आणण्याची मागणी मागील कित्येक वर्षांपासून केली जात आहे. त्याकरिता केंद्र सरकारने जनतेकडून मते मागितली. जाणकारांकडून मार्गदर्शन घेतले; मात्र त्याचे पुढे काय झाले ? हा प्रश्न आता सरकारला विचारला जात आहे. मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांच्या विधानाने वक्फ बोर्डाला दिलेल्या अमर्याद अधिकारांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर येण्याची शक्यता आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## तात्यासाहेब सुळे यांचा स्मृतिदिन उत्साहात साजरा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.७, मुंबई :** शिक्षक प्रिय कै. तात्यासाहेब सुळे यांचा स्मृतीदिन शेकाप मध्यवर्ती कार्यालय फोर्ट मुंबई येथे मंगळवारी टीडीएफ कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

यावेळी शिक्षक लोकशाही आघाडी (टी डी एफ) मुंबई चे वतीने तात्यांचा सर्वांनी भाषणबाजी न करता टीडीएफ चे कार्य आणखी पुढे व तळागाळातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पर्यंत कसे नेता येईल व त्यासाठी काय योगदान करणार यावर मत अनेकांनी व्यक्त केले तर सर्वांनीच तन मन धनाने तात्यांनी दिलेला टीडीएफचा पुरोगामी विचार व कार्य पुढे नेण्याचा संकल्प केला.टीडीएफ मुंबई च्या पुनर्रचनेवर देखील चर्चा झाली. सालाबादप्रमाणे येणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलन हे तज्ञ मान्यवरांच्या उपस्थितीत नवीन शैक्षणिक आराखडा, गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण या विषयांवर शिक्षक शिक्षकेतर कार्यकर्ता चर्चासत्र आयोजित करण्यात यावे असे ठरले.टीडीएफ च्या उपाध्यक्षा सन्मा ॲड अपूर्वा दाभोलकर यांनी दोन वर्षापासून बार कौन्सिल चे सदस्य बनून मुंबई उच्च न्यायालयात वकिली सुरू केली आहे,तर प्रवक्ते, पत्रकार ॲड सन्मा सुरेंद्र कुमार मिश्रा यांनी नुकत्याच बार कौन्सिल च्या सर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन सनद मिळविली आहे त्या दोघांचा सत्कार करण्यात आला,तर सन्मा ॲड अर्चना सोनावणे ह्या ३१ डिसेंबर २०२४ रोजी वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या असून लवकरच त्या बार कौन्सिल च्या परीक्षा देऊन सनद घेणार आहेत, अजून तीन ते चार कार्यकर्ते लॉ करीत आहेत ही टीडीएफ साठी अभिमानाची बाब आहे. राज्यांतील कुणाही अन्यायग्रस्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आर्थिक अडवणूक होणार नाही म्हणून टीडीएफ तर्फे वकिलांची टीम माफक दरात सेवा देणार आहेत.टीडीएफ चे कार्यकर्ते जमेल तसे सामाजिक कार्य देखील करीत असतात. यावेळी गणेश हिरवे हे त्यांच्या जॉय सामाजिक संस्थेतर्फे सातत्याने वर्षभर राज्यांतील आदिवासी, मागास भागातील विद्यार्थी, गरजू जनतेला शैक्षणिक साहित्य, शिधा, धान्य व गृहउपयोगी वस्तूंचे वाटप समाजातून, सहकाऱ्यांकडून वर्गणी जमा करून, पदरमोड करून करत असतात त्यांना नुकताच आदर्श पत्रकार पुरस्कार देण्यात आला. उपस्थित सर्वांचे आभार मानुन सुग्रास भोजनाचा आस्वाद घेत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## दापोली रिक्षा चालक मालक संघटना आयोजित कबड्डी स्पर्धा उत्साहात

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.०८, दापोली (रत्नागिरी) :** दापोली तालुकास्तरीय रिक्षा चालक मालक व्यावसायिक संघटना आयोजित भव्य कबड्डी स्पर्धा उत्साहात पार पडल्या रिक्षा चालक मालक व्यावसायिक संघटनेचे अध्यक्ष प्रेम चव्हाण, सचिव सचिन होडबे, खजिनदार दिनेश रेवाळे अन्य पदाधिकारी संजय भांबिड, रमेश रेमजे, अमित आलम, दिनेश कांबळे, आप्पा जागडे, संतोष धोपट अशा अनेक चालक व मालक सहकार्यानेच स्पर्धा यशस्वी झाल्या.दोन दिवस चालणा-या कबड्डी स्पर्धेकरिता दापोली तालुक्यातील १६ संघानी आपला सहभाग नोंदविला. अंतिम सामना श्रीराम कर्दे विरुद्ध अमर भारत टाळसुरे या दोन तुल्यबळ संघात लढत झाली.

त्यामध्ये अमर भारत टाळसुरे संघाने विजेतेपद संपादन केले. श्रीराम कर्दे संघातील साहिल माने, जितू या खेळाडूंनी जोरदार प्रतिकार केला. पण अफाक ऐनरकर व चिन्मय अगिने यांच्या बहारदार चढा-यांमुळे तर प्रथमेश लाले, प्रज्वल लाले, सिद्धेश कामेरकर, संजोग लाले, रोहीत चोगले यांच्या बचावामुळेच टाळसुरे संघाने विजेतेपद संपादन केले. स्पर्धेतील उत्कृष्ट चढाई म्हणून अफाक ऐनरकर उ स्पर्धेतील उत्कृष्ट पकड म्हणून सुरज सावंत यांना गौरविण्यात आले. या स्पर्धेला पंच प्रमुख म्हणून सत्यवान दळवी तर पंच म्हणून वृषाल उर्फ दादू सुर्वे, अक्षय सुर्वे, तुषार पाटील, सुधीर कदम, वैभव बोरकर, यांनी आपली भुमिका पार पाडली.

# जीवघेणा नायलॉन मांजा !



जानेवारी महिना उजाडला की सर्वांना वेध लागतात ते मकर संक्रांत या सणाचे. मकर संक्रांत हा हिंदू धर्मातील सर्वात महत्वाचा सण मानला जातो. मकर संक्रांतीनिमित्त पंतगोत्सव साजरा करण्याची आपल्याकडे खूप जुनी परंपरा आहे. रंगीबेरंगी पतंग आकाशात उडवून हा उत्सव साजरा केला जातो.

लहानांपासून मोठयांपर्यंत सर्वचजण पतंग उडविण्याचा आनंद यानिमित्ताने लुटत असतात पण अलीकडे हा खेळ जीवघेणा ठरत आहे. पतंग उडविण्यासाठी पूर्वी साधा सुती दोरा वापरला जात होता मात्र काही वर्षांपासून पतंग उडविण्यासाठी चिनी किंवा नायलॉन मांजाचा वापर केला जातो आणि हाच नायलॉन मांजा आता जीवघेणा ठरत आहे. मागील आठवड्यात पुण्यातील वारजे, धनकवडी आणि कात्रज - कोंडवा परिसरात दुचाकी वरून जाणाऱ्या व्यक्तींच्या गळ्याला नायलॉन मांजा कापल्याने दुखापत झाल्याची घटना घडल्या. केवळ नशीब बलवत्तर होते म्हणून त्यांचा जीव वाचला अर्थात सर्वांचेच नशीब बलवत्तर असते असे नाही. मागील वर्षी दुचाकीवरून जाताना नायलॉन मांजाने गळा चिरून पोलीस हवालदाराचा मृत्यू झाल्याची बातमी नुकतीच वाचण्यात आली होती.

अर्थात नायलॉन मांजाने गळा चिरून निष्पाप नागरिकाचा मृत्यू झाल्याची टी पहिलीच बातमी नव्हती दरवर्षी अशा बातम्या वर्तमानपत्रात वाचायला मिळतात. दौंडमध्येही दोन वर्षी अशाच प्रकारे एका दुचाकी स्वाराचा बळी गेला होता. तीन वर्षापूर्वी पुण्यात एका तरुणीला ही अशाच प्रकारे दुर्दैवी मृत्यू आला होता. केवळ पुण्यात नाही तर नाशिकमध्येही अशीच घटना घडली होती त्यातही एका महिलेचा नायलॉन मांजाने गळा चिरून दुर्दैवी मृत्यू झाला होता. अर्थात हे प्रातिनिधिक उदाहरणे आहेत अशाप्रकारे नायलॉन माजांने राज्यात अनेक निष्पापांना आपला जीव गमवावा लागला आहे.

या मांजामध्ये अडकून आकाशात मुक्तविहार करणारे पक्षीही जखमी होतात काही पक्षी मृत्यू पावतात. चिनी बनावटीचा हा मांजा नायलॉन धागा, काचेचा चुरा, लोखंडाचे कण आणि रासायनिक पदार्थांपासून बनवला जातो. हा मांजा माणसांसोबत पक्षी आणि प्राण्यांसाठी देखील घातक आहे. वास्तविक नायलॉन मांजाचा खरेदी विक्रीवर बंदी घालण्याचे आणि वापराबाबत प्रतिबंधात्मक उपायोजना करण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत.

मांजामुळे पशूपक्षांना होणाऱ्या दुखापतीच्या संदर्भात पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालयाने राज्य सरकारला पत्र पाठवले होते. नायलॉन मांजामुळे वन्यजीव ( संरक्षण ) अधिनियम १९७२ च्या अनुसूचितील वन्यप्राणी व पक्षांचा मृत्यू झाल्यास किंवा त्यांना दुखापत झाल्यास वन कायद्याच्या कलम ९ नुसार कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते त्यामुळे नायलॉन मांजाच्या विक्रीवर महाराष्ट्र सरकारने बंदी घातलेली असतानाही हा मांजा दुकानात सर्रास विकला जात आहे तरीही विक्रेत्यांवर कारवाई होताना दिसत नाही. काही ठिकाणी प्रशासनाने कारवाई केल्याच्या बातम्या आल्या ही समाधनाची बाब असली तरी कारवाईत सातत्य नाही.

जो मांजा दुकानात विकण्यासाठी येतो तोच मांजा प्रशासनाला कसा मिळत नाही? आणखी किती बळी गेल्यावर प्रशासनाला जाग येणार आहे ? प्रशासनाने नायलॉन मांजा विरोधात धडक मोहीम राबवायला हवी. नायलॉन मांजा विकणारा आणि खरेदी करणारा अशा दोघांवरही कारवाई व्हायला हवी. नागरिकांनीही नायलॉन मांजाने पतंग उडविण्याऐवजी साध्या सुती दोरीचा वापर करून पतंग उडवावी आणि हा सण साजरा करावा.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## गणित - विज्ञान प्रदर्शनात ढोकेश्वर विद्यालयाचे यश

### प्रदर्शनात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील भाळवणी येथिल महात्मा फुले माध्यमिक विद्यालयात झालेल्या विज्ञान, गणित पर्यावरण प्रदर्शनात ढोकेश्वर विद्यालयाने विशेष प्राविण्य मिळवले. प्रदर्शनात नववी ते बारावी विज्ञान गटात स्मित चव्हाण याच्या स्मार्ट सिटी उपकरणास प्रथम क्रमांक मिळाला. सहावी ते आठवी गणित गटात अथर्शी ठुबे हिच्या कॅलेंडर या उपकरणाला प्रथम क्रमांक मिळाला. तसेच विज्ञान गटात मनस्वी झावरे हिच्या कचरा व्यवस्थापन या उपकरणास तृतीय क्रमांक मिळाला. पहिले ते पाचवी विज्ञान गटात वैभवी कटारिया हिच्या रुरल ऍण्ड अर्बन सिटी या उपकरणास प्रथम क्रमांक मिळाला. तसेच गणित गटात सावनी तराळ हिच्या नैसर्गिक संख्येचा वर्ग व घन या उपकरणास तृतीय क्रमांक मिळाला. यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य सुनील वाव्हळ, पर्यवेक्षक बाळासाहेब खिलारी, डॉ.अजय ठुबे, प्रशांत तराळ, जयश्री चव्हाण, निलाक्षी कटारिया, सुवर्णा कडूस्कर,सोनम पायमोडे, जेष्ठ शिक्षक बाळासाहेब निवडुंगे, मल्हारी वाघसकर, निलम खिलारी, वैशाली गायखे,रवी ज्योतिक आदी उपस्थित होते. सुत्रसंचलन अतुल सैद यांनी केले. प्रास्ताविक रविंद्र ज्योतिक यांनी केले तर आभार मल्हारी वाघसकर यांनी मानले.

## दैनिक अक्षराजचे पत्रकार जे. के. पोळ 'पत्रकार भूषण' पुरस्काराने सन्मानित



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, ठाणे :** ०६ जानेवारी हा दिवस पत्रकारिता क्षेत्रामध्ये विशेष उल्लेखनीय दिवस समजला जातो. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी आजच्या दिवशी म्हणजे ०६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू करून मराठी पत्रकारितेचा पाया घातला, तो दिवस 'पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो.

पत्रकार दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई प्रणित पिंपरी चिंचवड शहर पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीने, आचार्य बाळशास्त्री जांभेकर, पत्रकार भूषण पुरस्कार सोहळा दिनांक ०६ जानेवारी २०२५ रोजी पुणे येथील ग.दि. माडगूळकर सभागृह, निगडी येथे आयोजित केला होता. त्या अनुषंगाने महाराष्ट्र (माध्यमांची) दशा आणि दिशा या विषयावर परिसंवादचे आयोजन केले होते. त्याचे प्रमुख संवादक प्रसिद्ध अभिनेते किरण माने होते. त्यामध्ये सहभागी वक्ते म्हणून एबीपी माझा च्या संपादिका सरिता कौशिक, भोसरीचे प्रथम आमदार विलास लांडे, कामगार नेते यशवंत भोसले, सचिन जवळकोटे, वसंत मुंडे, विश्वास आरोटे, पद्मश्री गिरीशजी प्रभुणे, संजय भोकरे, इरफान सय्यद, इत्यादी पत्रकार क्षेत्रातील दिग्गज लोकांनी आपला सहभाग नोंदवला होता. भारतातील १९७५ साली काँग्रेसने लागू केलेली आणीबाणी आणि आता दहा वर्ष चालू असलेली अघोषित आणीबाणी यावर साधक बाधक चर्चा झाली. वाद-विवाद, खडा-जंगी, पुन्हा समेट अशा प्रकारे वेगवेगळ्या रंगात चर्चा रंगली गेली. पत्रकारितेचे चुप राहणे, त्यांच्यावर दबाव असणे, या गोष्टी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या जरी मान्य केल्या तरी संवेदनशील पत्रकाराने मनातल्या मनात तरी आवाज उचलला पाहिजे, आज दशा खराब असेल आणि देशात चुकीची असेल तरीही भविष्यात दशा आणि दिशा या बदलल्या गेल्या पाहिजेत आणि त्या बदलल्या जातीलच, असा आशावाद सतत जिवंत राहिला पाहिजे. अशा प्रकारच्या निष्कर्षावर चर्चेला आणून संवादक किरण माने यांनी कमी वेळे अभावी चर्चा गुंडाळली.

त्यानंतर कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागात, समाजात आणि पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पत्रकारांना 'पत्रकार भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नवी मुंबई अध्यक्ष दशरथ चव्हाण आणि प्रथम न्याय चे पत्रकार विष्णू बुरे, यांना पत्रकार भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, तसेच दैनिक अक्षराज चे वरिष्ठ पत्रकार तथा ठाणे जिल्हा प्रतिनिधी जे.के. पोळ यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष वसंत मुंडे यांच्या हस्ते 'पत्रकार भूषण' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमाला महाराष्ट्रातील अनेक नामवंत व दिग्गज तसेच नवीन पत्रकारांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता.

## ग्रामदैवत सूर्यनारायण देव यात्रा उत्सव सुरू



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.९, पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथील ग्रामदैवत असलेल्या सूर्यनारायण देवाची यात्रा मोठ्या उत्साह सुरू झाली असून ही यात्रा ३१ डिसेंबर पासून सुरू असून ही यात्रा पुढे संपूर्ण महिनाभर २८ जानेवारीपर्यंत महिनाभर सुरू असते .परंतु यात्रेचा कालावधी हा रथ सप्तमी पर्यंत असल्याचे पुजारी गणेश अवताडे यांनी सांगितले.

पंढरपूर - सोलापूर -रोडवर अवघ्या दहा किलोमीटर वर असणाऱ्या नारायण चिंचोली येथे पुरातन हेमाडपंथी सूर्यनारायणाचे मंदिर असून हे मंदिर अति प्राचीन असून हे मंदिर अत्यंत दुर्मिळ व कोरीव बांधकाम असलेले महाराष्ट्रातील एकमेव असे मंदिर आहे. नारायण चिंचोली येथे सूर्यनारायण देव यात्रेनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो भाविक पौष महिन्यामध्ये दर्शन घेण्यासाठी येत असतात.

आलेल्या भाविकांसाठी सर्व प्रकारच्या देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा करण्यात आली असल्याची माहिती नारायण चिंचोली चे ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने करण्यात आल्याची माहिती सरपंच नर्मदा लक्ष्मण धनवडे, पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक तथा नारायण चिंचोली चे माजी सरपंच लक्ष्मण धनवडे, उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण यांनी दिली.

## जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स आणि महाराष्ट्र पोलीस यांच्यातर्फे 'रेझिंग डे' निमित्त कार्यक्रम




**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.०८, खडकवासला (पुणे)** : आज संपूर्ण जग तंत्रज्ञानाने व्यापले आहे. तंत्रज्ञानाचे जसे फायदे आहेत. तसेच तोटे देखील आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात दररोज तंत्रज्ञान बदलत आहे. सायबर गुन्ह्यांच्या हजारो तक्रारी देखील दाखल होत आहेत. आता घरफोडी, चोरी, दरोडा याचे प्रमाण कमी होऊन सायबर गुन्हयांमध्ये लक्षणीय वाढ होत असल्याचे परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी सांगितले. जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स आणि महाराष्ट्र पोलीस यांच्यातर्फे 'रेझिंग डे' निमित्त कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या सभागृहात करण्यात आले. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त अजय परमार, सिंहगड रोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईगडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे शाखा) उत्तम भजनावळे, सायबर तज्ञ पुष्पक शहा, अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर आदी उपस्थित होते.

संभाजी कदम म्हणाले, उत्तम शिक्षित लोकांची सायबरमध्ये फसवणूक होत आहे. त्यामुळे आपण जागृत व्हायला हवे. समोर आलेल्या अमिषाच्या पाठीमागे जाऊन आपण अडकतो. त्याचा आपल्यासोबत कुटुंबाला देखील त्रास होत आहे. आपली सुरक्षा आपल्याच हातात आहे. दिलीप दाईगडे म्हणाले, महाराष्ट्र पोलिस स्थापना दिनावाच्या निमित्ताने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पोलीस व जनता समन्वयासाठी असे कार्यक्रम उपयुक्त आहेत. यंदा मोबाईल फोन व सोशल मीडिया याविषयी जनजागृतीपर कार्यक्रम हाती घेतला आहे.ॲड. शार्दूल जाधवर म्हणाले, आपल्या रक्षणासाठी जीवाचा त्याग करण्याची भावना ठेवून हे पोलीस कार्यरत आहेत. कोविड काळात पोलीस बांधवांनी खूप मोठे काम केले. त्यामुळे पोलीस बांधवांसाठी व कुटुंबासाठी संस्थेतर्फे आरोग्य शिबीर घेऊ. पोलीस बांधवांसाठी आरोग्यविषयक आपत्तीमध्ये मदत करण्याचा प्रयत्न संस्था करेल.

## अहिल्यानगरमध्ये आजपासून सावित्री ज्योती महोत्सवास प्रारंभ

### मोफत महाआरोग्य शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.८, अहिल्यानगर :** शहरातील गुलमोहर रोड येथे कोहिनूर मंगल कार्यालयात दिनांक ९ ते १२ जानेवारी दरम्यान सालाबाद प्रमाणे सावित्री ज्योती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये मोफत महाआरोग्य शिबिर घेण्यात येणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष किशोर डागवाले व डॉ.दिलीप जोंधळे यांनी दिली.

जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत युवक कल्याण योजनेमार्फत जय युवा अकॅडमी, समर्पण बहुउद्देशीय सामाजिक संस्था, उडान फाउंडेशन, रयत प्रतिष्ठान, प्रगती फाउंडेशन, जीवन आधार प्रतिष्ठान, अहिल्या फाउंडेशन, मुंबादेवी प्रतिष्ठान, समाज परिवर्तन संस्था आदींच्या माध्यमातून जिल्हा रुग्णालय, संपूर्ण सुरक्षा केंद्र, बाळासाहेब देशपांडे रक्तपिढी, अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभाग, आनंद जनरल हॉस्पिटल, इंडो आयरिश हॉस्पिटल, काकासाहेब म्हस्के मेडिकल कॉलेज, यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेज आदींच्या सहयोगातून भव्य रक्तदान शिबिर, रक्ताच्या विविध तपासण्या, नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर, दंत तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, होमिओपॅथी उपचार, हाडांची तपासणी, हृदयरोग, मधुमेह, पाठदुखी, गुडघेदुखी, बालरोग, किडनी विकार, स्त्री आरोग्य तपासणी,

आयुर्वेद उपचार पद्धतीवर मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

शिबिरासाठी डॉ. भास्कर रणनवरे, डॉ. अनिल बोरगे, डॉ.कल्पना रणनवरे, डॉ.संजीव गडगे, डॉ.प्रमोद पालवे, डॉ. संतोष गिऱ्हे, डॉ. धनाजी बनसोडे, डॉ.तस्लीमा पठाण, डॉ.सतीश लोंढे, डॉ.अनिता लोंढे, डॉ. सतीश राजुरकर आदी विविध वैद्यकीय तज्ञ रुग्णांची तपासणी करणार आहेत.

या शिबिरासाठी जयश्री शिंदे, कांचन लद्दे, संतोष काळे, शिवाजी जाधव, अश्विनी वाघ, कावेरी कैदके, ॲड. पुष्पा जेजुरकर, आरती शिंदे, पोपट बनकर, बाबू काकडे आदी संस्थानचे प्रतिनिधी प्रयत्नशील आहेत. शिबिरासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी आत्मसिद्ध सोनलकर, जिल्हा क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, राज्य क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरांगे, विशाल गर्जे, प्रविण कोंढावळे, नेहरू युवा केंद्राचे जिल्हा समन्वयक संकल्प शुक्ला, प्रा. हर्षल आगळे, सुहासराव सोनवणे यांचे मार्गदर्शन लभत आहे.

## जिल्ह्यात कांदा लागवडीला वेग; मजूरटंचाईची समस्या



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** सध्या पारनेर तालुक्यातील टाकळीढोकेश्वर, निघोज पट्टयासह जिल्ह्यात सर्वत्र उन्हाळ कांद्याची लागवड सुरू आहे. मजुरांनी मोठ्या प्रमाणावर रोजंदारीत वाढ केल्यामुळे व सर्वत्र एकाच वेळेस लागवड सुरू असल्यामुळे शाळा-कॉलेजला दांड्या मारून शालेय विद्यार्थीही मिशन कांदा लागवडीसाठी आई वडिलांना मदत करत असल्याचे चित्र सध्या ढवळपूरीसह वनकुटे, मांग़वे परिसरातील शेतांमधून दिसत आहे. टाकळी ढोकेश्वर परिसरात उन्हाळ कांद्याची लागवड जोमात सुरू आहे.

भारनियमनामुळे काही गावांमध्ये एका सप्ताहात तीनच दिवस दिवसा लाईट मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर रात्रीचा दिवस करत मेहनत कसरत करावी लागत आहे. या दिवसांत शेतकरी सकाळी उठल्यावर सहा वाजताच मजुरांच्या दारी जात असल्याचे दिसून येत आहे. शेतकऱ्यांना मजूर उपलब्ध होत नसल्यामुळे महागडी मजुरी देऊनही 'मजूर मिळेल का मजूर' असे म्हणण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

दरवर्षी ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील माळशेज घाटाच्या माथ्यावरील व अकोले तालुक्यातील आदिवासी पट्ट्यातून मजुरांचा जथ्था येतो. यंदा त्यांनी ही बत्ती दिल्याने नेहमीच्या शेतकऱ्यांचा नियोजनाचा अंदाज चुकला असल्याचे शेतकरी सांगतात. त्यामुळे मजुरीच्या दरातही यावर्षी मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. घरची कांदा लागवड व मजूरही मिळत नसल्यामुळे पालकांकडून विद्यार्थ्यांना लागवडीसाठी शाळेला सक्तीची सुटी घेण्यास भाग पाडले जात आहे. आपल्या मुलांकडून कांदा रोपे उपटणे, पाणी भरणे, वावर बांधणे, खत टाकणे, मजुरांजवळ कांदा रोपचे क्रेट वाहून नेणे इत्यादी कामांनी शालेय मुले घामाघूम झालेले दिसत आहेत. नियमित शाळेला दांडी मारणारे बहाद्दर आता शाळेत जाण्याकरिता काहीतरी घरच्यांना कारणे सांगून पळवाटा शोधूत असल्याचे शेतातील मजूर वर्ग दुपारच्या जेवणाच्या वेळेत खमंग चर्चा रंगताना दिसून येतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर शाळांची उपस्थिती रोडावल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मजूर वर्गाने यावर्षी मोठ्या प्रमाणावर मजूरीत वाढ केली आहे.

३०० ते ४०० रुपये देऊन ही मजूर मिळत नसल्यामुळे व कांदा रोपे विकत घेऊन लागवड करावी लागत असल्याने मोठे शेतकरी हवालदिल झाले आहेत. तर या कांदा लागवड सिझन मध्ये गावागावात दिवसा सामसूम दिसून येत आहे.

## केईएम रुग्णालयातील वाचनालय हटविण्यास कर्मचाऱ्यांचा प्रखर विरोध



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, मुंबई :** गेल्या अनेक वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या वाचनालयाची वास्तू दिनांक ०६ जानेवारी २०२५ सायंकाळी ४ वाजता केईएम रुग्णालय प्रशासन शतक महोत्सवी वर्षाच्या नुतनीकरणाचे कारण सांगत, अचानकपणे वाचनालयाची वास्तू हटविण्यासाठी सांगण्यात आले आहे.

वाचनालयाचे सर्व साहित्य तात्पुरत्या स्वरूपात जिमखान्यात ठेवाव्यात असा एवढाच तोंडी संदेश देत कोणत्याही प्रकारची व्यवस्था आणि भक्कम अशी पर्याय उपलब्ध करून न देता वाचनालय हटविण्यासाठी प्रशासनाने टोकाची भूमिका घेतली आहे.

या संदर्भात केईएम रुग्णालयातील सर्व कामगार, कर्मचारी आणि त्यांच्या वेगवेगळ्या संघटनांचे पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने चुकीच्या पद्धतीने वाचनालय हटविण्यास ठाम विरोध केला आहे. केईएम कामगार संघटनेच्या जयंती उत्सव कमिटीचे साहित्य महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिवछत्रपती शिवाजी महाराज, महामानव परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर, राजश्री शाहू महाराज, यांच्या सह इतर महापुरुषांच्या तसबिरी, मुर्त्या ठेवल्या आहेत त्यांचे पावित्र्य राखणे गरजेचे आहे.

म्हणूनच वाचनालय हटविण्यास ठाम विरोध दर्शविला आहे, वाचनालयाचे नुतनीकरण करून सुशोभित करावे असा आग्रह कामगारांनी धरला आहे पण प्रशासन काही ऐकण्यास तयार नाही . कामगारांच्या भावनांचा आदर करीत परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तात्काळ म्युनिसिपल मजदुर युनियन,

मुंबईचे सरचिटणीस वामन कविस्कर, प्रफुलता दळवी, अनिल निरभवने, रामगोपाल डागोर, प्रफुल्ल अहिरे, शंकर खरात, विनोद जाधव, म्युनिसिपल कामगार सेनेच्या सरचिटणीस रचना अग्रवाल, उपाध्यक्ष संजय कोईलकर, केईएम अध्यक्ष देवा सावंत, पि.एल. सिंग मनसे कामगार सेनेचे लहू घोगळे, महेंद्र परब, दि.म्युनिसिपल मजदुर युनियन ७० चे केईएम अध्यक्ष संजय सरोहा इतर सर्व संघटनेच्या नेत्यांनी व पदाधिकाऱ्यांनी अधिष्ठाता यांच्या भेटीसाठी आले होते. अधिष्ठाता प्रशासकीय कमासाठी मंत्रालयात गेल्यामुळे त्यांची भेट होऊ शकली नाही.

वैद्यकीय अधीक्षक आणि उप. अधिष्ठाता यांची भेट घेऊन वाचनालयाची वास्तू हटविण्यात येऊ नये असे ठामपणे सन्माननीय कविस्कर साहेबांनी ठासून सांगून युनियनच्या वतीने पत्रही देण्यात आले आहे. सर्व कामगार संघटनेचे प्रतिनिधी सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विज्ञान-तंत्रज्ञान प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा उस्फूर्त सहभाग

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०७, खंडाळा (सातारा) :** खंडाळा विभाग शिक्षण समिती संचलित राजेंद्र विद्यालय, खंडाळा इंग्लिश मिडीयम स्कुल आणि सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय खंडाळा यांच्या संयुक्त विद्यमाने एआर गुरुजी इंटरनॅशनल लॅब, भारत समन्वयातून राजेंद्र विद्यालय प्रांगणात संपन्न झालेल्या राष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान महोत्सव २०२५ अंतर्गत दिनांक ०७ जानेवारी २०२५ रोजी सातारा जिल्ह्यातील पहिल्या कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित तालुकास्तरीय विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी उदघाटन समारंभसाठी भारत एआर गुरुजी लॅब, सीईओ प्रताप पवार, महाराष्ट्र प्रशासकीय अधिकारी राजेंद्र खवले, टी.ई. कनेक्टिविटी चे एच.आर.संजय होन, पंचायत समिती खंडाळा गटविकास अधिकारी अनिल वाघमारे, विस्तार अधिकारी रमेश यादव, केंद्रप्रमुख सुनिता साबळे, खंडाळा विभाग शिक्षण समिती सचिव अनिरुद्ध गाढवे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व फीत कापून प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना संजय होन म्हणाले-सद्यस्थितीत विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि विद्यार्थी यांचे विज्ञानाशी नाते तंत्र-संसाधनानी अधिक घट्ट झाले असून अभ्यासक्रमसोबत नव्या कल्पना सोबत नवं काहीतरी करू पाहतायेत. कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित तालुकास्तरीय विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रदर्शन चे आयोजन ही आदर्श संकल्पना आहे. याचा निश्चित विद्यार्थ्यांना फायदा होईल.



बीडीओ वाघमारे म्हणाले- खंडाळा तालुक्यात शिक्षणाचा दर्जा उंचावत विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण शिक्षणाची दारं खुली करून देण्यासाठी शिक्षण महर्षी शंकरराव गाढवे यांचे योगदान असाधारण असून सचिव अनिरुद्ध गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक संस्थेचा कायापालट होत आहे. याचेच उत्तम उदाहरण म्हणजे संपूर्ण जिल्ह्याला दिशादर्शक असणारी राजेंद्र विद्यालयातील एआर गुरुजी लॅब मैलाचा दगड ठरत आहे. पारितोषिक वितरण सोहळ्यासाठी गटशिक्षणाधिकारी गजानन आडे यांच्यासमवेत खंडाळा विभाग शिक्षण समिती संचालक एस.आर. सावंत, वसंतराव पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आपल्या कल्पक व भन्नाट संकल्पनेतून साकारलेल्या वैज्ञानिक साहित्य संसाधन, मॉडेल्सना लहान गट व मोठया गटात पुरस्कार-२०२५ साठी एआर जी इनोव्हेशन अवॉर्ड, एआर जी सोशल इम्पॅक्ट अवॉर्ड, एआर जी यंग सायंटीस्ट अवॉर्ड, एआर जी गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी विज्ञान प्रदर्शनात ५ हजार पेक्षा अधिक विद्यार्थी, २५० स्पर्धक, १२५ कीटकनाशक रोबोट, स्मार्ट रोबोट, अग्निशमन स्वयंचलित रोबोट, स्मार्ट जलशुद्धीकरण मशीन, वीजबचत पथदिवे अशा कल्पक मॉडेल चा सहभाग होता. यांचे व्यवस्थापन,नियोजन कृती कार्यात झटून काम करणाऱ्या सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय बीसीए आणि विज्ञान विभाग मधील विद्यार्थ्यांचा उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. या समारंभाचे प्रास्ताविक प्राचार्य शब्बीर नालबंद यांनी निवेदन व सूत्रसंचालन प्रा.अमीर इनामदार, प्रा.प्रदीप बोरगावे यांनी आभार सोमनाथ गर्जे, पर्यवेक्षक धनंजय महामुनी यांनी मानले. हा सोहळा यशस्वी होण्यासाठी राजेंद्र विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद, कार्यालयीन कर्मचारी, खंडाळा एआर गुरुजी लॅब च्या समन्वयिका पूजा चौधरी व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# थोडक्यात

## 'षठं प्रति षाठ्यम्' नाटकाने मारली बाजी



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०७, शहापूर (ठाणे) :** ग्रामीण कला मंचने सादर केलेल्या कामगार कल्याण केंद्र टागोरनगर, विक्रोळी प्रस्तुत षठं प्रति षाठ्यम् या नाटकाने कामगार कल्याण केंद्र आयोजित नाट्य स्पर्धेत दोन पारितोषिक जिंकले आहेत. डॉ.आरती अंदाडे आणि प्रसाद वैद्य या दोन कलाकारांनी अभिनयाचे पारितोषिक जिंकून शहापूर तालुक्याची मान उंचावली आहे. नुकतेच बक्षिस वितरण समारंभ पार पडला असून दोन्ही कलाकारांना प्रमाणपत्र प्रदान करून गौरवीण्यात आले आहे. 'षठं प्रति षाठ्यम्' हे नाटक कामगार कल्याण केंद्र, ठाणे विभाग आयोजित स्पर्धेत सादर झाले होते. राज्य नाट्य स्पर्धेत ही या नाटकाने दोन पारितोषिक जिंकले होते. या स्पर्धेत ही डॉ.आरती अंदाडे आणि प्रसाद वैद्य या दोन कलाकारांनी पारितोषिक जिंकल्याने त्यांचे कौतुक होत आहे. ग्रामीण भागातील कलाकार मुंबईत नाट्य सादरीकरण करून पारितोषिक जिंकतात ही बाब उल्लेखनीय आहे. ग्रामीण कला मंचने याआधीही अनेक स्पर्धामध्ये यश संपादीत केले असून पुढील येणाऱ्या स्पर्धामध्ये वेगवेगळी दर्जेदार नाटक सादर करून ग्रामीण कला मंचचे नाव मोठे करण्याचा निर्धार आहे.

## आवताडे शुगर २८०० रुपये प्रति टन याप्रमाणे ऊस बिल खात्यावर जमा - चेअरमन आवताडे



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०८, पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या आवताडे शुगर अँड डिस्टीलरीज प्रा. लि. नंदुर. या साखर कारखान्याचे गळीत हंगाम २०२४-२५ मधील ३० नोव्हेंबर पर्यंतचे उसाचे बिल २८०० रुपये प्रति टन याप्रमाणे शेतकरीए ऊस उत्पादकांच्या खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांनी माध्यमांना दिली . यावेळी मंगळवेढा मार्केट कमिटीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, कार्यकारी संचालक मोहन पिसे, भारत निकम, सरव्यवस्थापक (टेक्नी) सुहास शिनगारे, मोहन पवार, संभाजी फाळके, बजीरंग जाधव, शेती अधिकारी राहुल नागणे, तोहीद शेख, दामोदर रेवे उपस्थितीत होते.

यावेळी बोलताना चेअरमन संजय आवताडे म्हणाले की २ वर्षापूर्वी आमदार समाधान दादा आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली फॅब्रटेक समूहातून हा कारखाना खरेदी करून आवताडे उद्योग समुहाने घेतल्यानंतर कारखान्याचा हा तिसरा हंगाम सुरू असून कारखान्याची वाटचाल व्यवस्थित सुरू आहे. आम्ही हा कारखाना केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतला असून या कारखान्यामधून आम्ही कोणताही स्वार्थ ठेवला नाही, आतापर्यंतच्या गळीत हंगामामध्ये कारखान्याचे सर्व कर्मचारी, ऊस वाहतूकदार, ऊसतोड मजूर व कारखाना प्रशासनाने मन लावून व प्रामाणिक काम केल्यामुळे आम्ही मागील दोन्हीही गळीत हंगाम यशस्वीरित्या पार पाडले. यावेळीही असेच सहकार्य सर्व कर्मचारी, ऊस पुरवठादार, ऊस उत्पादक हे करत असून आजअखेर २ लाख मेट्रिक टन गाळप केले आहे. गळीत हंगाम यशस्वीरित्या पार पाडून शेतकऱ्यांचे समाधान होईल असा कारभार करून शेतकऱ्यांच्या विश्वासाला पात्र राहण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू तरी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आमच्यावर विश्वास ठेवून आपला ऊस आवताडे शुगरला घालून सहकार्य करावे असे आवाहनही चेअरमन संजय आवताडे यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

# पंढरपूर उपविभागीय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या गावच्या पोलीस पाटलांची कार्यशाळा संपन्न

## पोलीस पाटील हे गाव आणि प्रशासनातील महत्वाचा दुवा-उपविभागीय अधिकारी इथापे



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०७, पंढरपूर :** पोलीस पाटील हे गाव आणि प्रशासनातील महत्वाचा दुवा असल्याने गावातील इत्यंभूत माहिती प्रशासनाला मिळते. पाटलांच्या मदतीने प्रशासन देखील शेवटच्या घटकापर्यंत पोहचते म्हणून गावखेड्यात पोलीस पाटलांचे महत्व टिकून असल्याचे मत पंढरपूर उपविभागीय अधिकारी इथापे यांनी व्यक्त केले.

पंढरपूर उपविभागीय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या गावच्या पोलीस पाटलांची कार्यशाळा दिनांक ०७ जानेवारी २०२५ रोजी पंढरपूर येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते ते पुढे म्हणाले की, निवडणूक काळात पोलीस पाटलांची मोठी मदत मिळाली आहे. आजपर्यंत पोलीस पाटील यांनी पोलीस व महसूल प्रशासनाचे समाधान कारक काम केले असल्याचे सांगताना पुढील काळातही चांगल्या कामाची अपेक्षा व्यक्त केली. आमच्या स्तरावरील ज्या काही पोलीस पाटील यांच्या मागण्या असतील त्या पूर्ण करण्याचे आश्वासन देखील इथापे यांनी दिले. २०१८ साली अनेक नवीन पोलीस पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. परंतु कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले नव्हते. बऱ्याच वर्षातून कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल पोलीस पाटलांनी समाधान व्यक्त केले. जिल्हाध्यक्ष नानासाहेब शिंदे यांनी पोलीस पाटलांना मार्गदर्शन केले. पंढरपूर अध्यक्ष विजय वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेप्रसंगी पोलीस पाटील संघटनेचे राज्याध्यक्ष दिलीप पाटील, राज्य उपाध्यक्ष प्रशांत पाटील, राज्य सचिव साधना देठे, राज्य प्रसिद्धी प्रमुख तोफिक शेख, जिल्हाध्यक्ष नानासाहेब शिंदे प्रमुख उपस्थित होते.

पोलीस पाटलांनी आपल्या अधिकाराचा योग्यप्रकारे वापर करावा. पोलीस पाटील अधिकार व कर्तव्ये अशा कार्यशाळेच्या माध्यमातून आपल्याला माहिती मिळते. पाटलांनी वेळोवेळी तहसीलदार उपविभागीय अधिकारी यांचे मार्गदर्शन घेऊन कर्तव्ये पार पाडावीत. पोलीस पाटलांनी पोलीस पाटील अधिनियम १९६७ प्रमाणे काम करून प्रशासनाला मदत व गावकऱ्यांना न्याय द्यावा.

**दिलीप पाटील (राज्याध्यक्ष पोलीस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य)**

पोलीस पाटील चोवीस तास तत्पर राहून पोलीस व महसूल प्रशासनाला मदत करतात. परंतु जिल्ह्यांतील काही घटनांमध्ये पोलीस पाटलांच्या मागे प्रशासन खंबीरपणे राहताना दिसले नाही, तरी प्रशासनाने पोलीस पाटलांना पाठबळ द्यावे. पंढरपूर उपविभागातील रिक्त गावच्या पोलीस पाटील पदाची तात्काळ भरती करावी.

**तौफिक शेख (प्रसिद्धी प्रमुख पोलीस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य)**

## जव्हार तालुक्यातील नागरिकांची रोजगारासाठी वणवण

## आदिवासी कुटुंबीयांचे स्थलांतर, गावे झाली ओस...



**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.८, जव्हार (पालघर) :** जव्हार तालुक्यातील नागरिकांचे रोजगारासाठी आदिवासी कुटुंबीयांचे स्थलांतर गावच्या गावे झाली ओस दिवाळी होऊन जवळपास दोन महिने उलटून गेले आहेत तरी लोकांना हाताला मंजुरी नाही म्हणून मुल बाळ घेऊन आपला गाव वस्ती सोडून मंजुरीसाठी होते स्थलांतर एकीकडे रोजगार हमी योजनेवर हजारो कोटी खर्च केला जातो परंतु जव्हार तालुका अजूनही विकासापासून कोसो दूरच आहे असे चित्र दिसून येत आहे.

केंद्र व राज्य सरकारकडून रोजगारासाठी अनेक योजना जाहीर होतात मात्र मनरेगा वगळता अन्य कोणतीही योजना आदिवासी पर्यंत पोहोचलेली नाही. त्यात बऱ्याच योजना हे कागदावरच राबविले जातात आदिवासी विभागाकडून आलेला निधी परत जातो नाहीतर इतरत्र पळविला जातो व अनेक कारणामुळे तालुक्यातील आदिवासी बांधव प्रत्येक वर्षी आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी रोजगार शोधणे करिता भटकंती करावी लागते त्यामुळे झोपड्यांना काटे कुटे लावून दारे बांधून नागरिकांनी धरली शहराची वाट याकडे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

ग्रामीण आदिवासी बांधव आर्थिक हालाखीत व दारिद्र्यात जीवन जगतो. त्यातच त्याच्या हाताला काम नसल्याने आपल्यासह सहकुटुंबाच्या पोटापाण्याच्या प्रश्न सोडवायचा कसा असा प्रश्न श्रमिकांना भेडसावू लागत असून दोनशे ते तीनशे रुपये रोजंदारीने शेवटी मिळेल ते काम करून पैसे मिळवण्याचा प्रयत्न हे नागरिक करीत आहेत. स्थलांतरित कुटुंबातील मुलांच्या शिक्षणावर मोठा परिणाम होत असून गावे रिकामी होत असल्याने शाळासुद्धा ओसाड पडण्याचा धोका निर्माण होत आहे. या सर्व गंभीर बाबीकडे प्रशासन ग्रामीण लोकप्रतिनिधिंनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन स्थानिक रोजगार निर्मितीला भर देऊन नागरिकांच्या हाताला काम द्यावे जेणेकरून हे होत असलेले स्थलांतरला आळा घालता येईल.

# निलेश लंके प्रतिष्ठाने केली २१ हजार रूग्णांची नेत्र तपासणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने पारनेर-नगर मतदारसंघात आयोजित करण्यात आलेल्या नेत्रतपासणी शिबिरात २१ हजार १९४ रूग्णांची तपासणी करण्यात येऊन १८ हजार ४८१ रूग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

२ हजार ६४९ रूग्णांचे मोतीबिंदूचे निदान झाले असून दररोज ३० रूग्णांवर पुण्यात शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. खासदार नीलेश लंके व राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून दि. १२ डिसेंबरपासून मोफत नेत्र तपासणी, चष्मा वाटप व मोतीबिंदू शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी पारनेर नगर मतदारसंघातील शिबिरांचा समारोप झाला. दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी पारनेर येथे गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वितरण करण्यात आल्यानंतर बाभुळवाडे व वडझिरे येथे मोफत नेत्रतपासणी शिबिरास प्रारंभ झाला. त्यानंतर जवळे, लोणीमावळा, निंबळक, अळकुटी, राळेगणथेरपाळ, वाडेगव्हाण, राळेगणसिध्दी, निघोज, कर्जुले हर्या, कान्हूरपठार, रांजणगांवमशिद, रूईछत्रपती, खडकवाडी, ढवळपुरी, नांदूरपठार, सावरगांव, पिंपळगांवरोठा, पुणेवाडी, पारनेर, मांडवेखुर्द, गोरेगांव, दैठणे गुंजाळ, टाकळीढोकेश्वर, सुपा, नेप्ती, काताळवेढा, पळसपुर, पळशी, देहरे, जातेगांव, चास, सारोळा कासार, अरणगांव, वाकोडी, शिंगवे नाईक, भाळवणी, अकोळनेर, देऊळगांव सिध्दी, कामरगांव, टाकळीखातगांव, नवनागापुर, पोखरी व वनकुटे येथे शिबिरे पार पडली. या गावांच्या परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. प्रत्येक गावामधील शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला. नेत्र तपासणीनंतर रूग्णांना तात्काळ चष्म्याचे मोफत वितरण करण्यात आले तर मोतीबिंदूचे निदान झालेल्या रूग्णांवर दररोज ३० याप्रमाणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत.



गरजू वंचितांची सेवा करण्याचे भाग्य लाभलेलोकांच्या चेहऱ्यावर हसू आणणे आणि त्यांच्या अडचणी समजून घेणे हेच माझ्यासाठी सर्वात मोठं समाधान आहे. जनतेच्या सेवेसाठी माझा प्रत्येक क्षण समर्पित आहे. आरोग्य सेवा असो किंवा इतर कोणतीही गरज, मी नेहमीच जनतेसोबत आहे. जनतेच्या प्रेमावर आणि विश्वासावर माझे कार्य उभे आहे. हे कार्य असेच सुरू राहणार आहे. मोफत नेत्र तपासणी शिबिराच्या माध्यमातून गरजू, वंचित रुग्णांची सेवा करण्याचे भाग्य लाभले.

**- निलेश लंके (खासदार)**

# राजगुरुनगर येथील घटनेच्या निषेधार्थ गिरी गोसावी समाजाच्या वतीने निवेदन

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.८, मुदखेड (नांदेड) :** पुणे राजगुरूनगर येथिल दोन पिडीत मुलींवर बलात्कार करुन निर्घृण खुन करण्यात आला. त्या नरधामास फाशीची शिक्षा देण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे गिरी गोसावी समाजाच्या वतीने मुदखेड तहसीलचे तहसीलदार यांच्याकडे केली आहे.

राजगुरूनगर येथिल पिडीत मुलीवर बलात्कार करून निर्घुण हत्या करण्यात आली.

त्या नरधामास फाशीची शिक्षा व्हावी म्हणून मुदखेड न्याहाळी येथिल गिरी गोसावी समाज व मुदखेड येथील सर्वांच्या वतीने आपणास विनंती करतोत आमचा आवाज आमचे निवेदन शासन दरबारी पोहचुन पिडीत मुलीला व परिवारास न्याय मिळावून द्यावा व त्या नराधमास फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी निवेदनाद्वारे मागणी केली आहे. काळीमा फासणाऱ्या या घटनेचा गिरी गोसावी समाज न्याहाळी व सर्व नागरीक मुदखेडच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला आहे.

यावेळी निवेदनकर्ते मानसिंग गिरी, उत्तम गिरी, संजय बन्सी गिरी, मारोती गिरी,संजय गिरी संजय आऊलवार, कैलास गोडसे, मुजीब पठाण, शिवा तोटेवाड, बालाजी कवडेकर, ज्ञानेश्वर गिरी, भिमराव, विश्वनाथ महादवाड राजु गिरी, संजय गिरी, साहेबराव पावडे, सचिन मगरे, नितिन गोडसे, संजय सोनटक्के अविनाश झमकडे, साहेबराव चव्हाण, बालाजी गिरी, सय्यद अमजद, रामराव वडजे, बालाजी गिरी, मारोती गिरी, बालाजी महादवाड, राजु बारतोंडे, बालाजी चव्हाण, मारोती बिच्चेवाड, अमेल आबादार, अंकूश मामीडवार, वेदांत शेवटे, यांसह आदिंची उपस्थीती होती